# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर.

## (शिक्षण विभाग)

जा.क्र.४५७३/शि.वि./२०१५ | दि.०९/०७/२०१५

**प्रति,**

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
प्राथ./उच्च प्राथ./माध्य. शाळा,
म.न.पा., नागपूर

**विषय :- आपले शाळेत असलेल्या शिक्षकांमधून MSCIT परीक्षा उत्तीर्ण व संगणकीय कार्य करण्यास इच्छुक शिक्षकांबाबत.**

**संदर्भ** – शिक्षण विभागाचे परिपत्रक क्र.१२१/शि.वि./२०१३,दि.१७.०४.२०१३

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये सन २०१०-११ पासून म.न.पा. च्या इच्छुक शिक्षकांना MSCIT चे प्रशिक्षण विभागामार्फत खाजगी संस्थांच्या मदतीने देण्यात येवून ६२५ शिक्षकांनी प्रस्तुत संगणक परिक्षा उत्तीर्णसुध्दा केलेली आहे. प्रस्तुत शिक्षकांच्या सेवा संगणकीय प्रशिक्षणाकरीता घेण्यास्तव उपरोक्त परिपत्रकाअन्वये इच्छुक शिक्षकांची नावे शाळा निरीक्षकांमार्फत विभागाने मागविली होती. परंतू, यांस प्रतिसाद प्राप्त झाला नाही. यामुळे प्रस्तुत परिपत्रकाअन्वये निर्देश देण्यात येतात की, सर्वप्रथम आपले शाळेतील जे शिक्षक संगणक साक्षर आहेत व शाळेतील संगणकीय कार्य व विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देण्यास स्वत: इच्छुक असतील, अशा शिक्षकांची नावे मुख्याध्यापकांनी दि.१६.०७.२०१५ पर्यंत आपले झोन चे शाळा निरीक्षकांकडे सादर करावीत.

शाळेतील कोणताही शिक्षक तयार न झाल्यास मुख्याध्यापकाने आपले स्तरावर MSCIT उत्तीर्ण शिक्षकांमधून एका शिक्षकाचे नाव अनिवार्यपणे प्रस्तावित करावे. नावे प्राप्त न झाल्यास किंवा शाळेत MSCIT संगणक परिक्षा उत्तीर्ण शिक्षक नसल्यास मुख्याध्यापकांनी तसे विभागास कळवावे.

दिवसेंदिवस कमी होत चाललेल्या पटसंख्येमुळे अनेक शाळा वा शाळांमधील वर्गतुकडया बंद होत असून मोठया प्रमाणात शिक्षक अतिरिक्त होत आहेत. यामुळे म.न.पा. शिक्षकांमधून संगणकावर काम करण्याची आवड असणाऱ्या किंवा संगणक शिकवू शकणाऱ्या शिक्षकांना संगणक शिक्षकाच्या कार्याची जबाबदारी देवून अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्याचा सुध्दा हा एक प्रयत्न आहे. यामुळे अतिरिक्त शिक्षकांच्या प्रश्नाचे गांभीर्य ओळखून शिक्षकांनी आपली नावे सादर करावीत, जेणेकरून विभागास बंद केलेला संगणक प्रकल्प विभागा अंतर्गतच सुरू करावयाचा असल्यास त्या अनुषंगाने उपाययोजना करणे शक्य होईल.

**टिप** – माध्यमिक शाळांमध्ये माध्यमिक आस्थापनेवरील शिक्षकांची नावे प्रस्तावित न करता प्राथमिक आस्थापनेवरील शिक्षकांमधून नावे प्रस्तावित करण्याचा प्रयत्न करावा.

**(मा.अपर आयुक्त यांचे दि.२२.०३.२०१३ चे मंजुरी अन्वये)**

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर